जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ७८८ दिनांक - ०६/११/२०२३

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# विनोद बालाजी सोमवंशी (टोळी प्रमुख) व त्याचे इतर १२ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

यातील फिर्यादी महिला यांचे सर्वे नं.३३,जांभुळवाडी रोड,शनीनगर,आंबेगाव-खुर्द,पुणे येथे दोन मजली बिल्डींग असुन,पहिल्या मजल्यावर त्यांचे किराणा मालाचे दुकान असुन,ते त्यांनी भोडेकरू यांना दिले आहे. दि.०५/१०/२०२३ रोजी सायंकाळी नमुद इसम विनोद सोमवंशी व त्यांचे इतर साथीदारांनी फिर्यादी यांचे बिल्डींग मध्ये येवुन,बेकायदेशीर जमाव जमवुन,फिर्यादी व त्यांचे भाडेकरू यांना खंडणी मागुन,सदर बिल्डींग मधील फिर्यादी यांचे घराचे दारावर खिडक्यावर लाथाने व दगडाने मारून,फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांचे पार्कीग मधील वाहनांची तोडफोड करून,फिर्यादी यांचे नातेवाईकांना मारहाण करून,फिर्यादी व त्यांचा मुलगा यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,फिर्यादी यांचे मुलाचे डोक्यात धारधार हत्याराने मारून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेबाबत,फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६४५/२०२३,भादवि कलम ३०७,३८५, ३८७,३२४,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४, ५०६(२),१२०(ब),४२७,क्रिमीनल लॉ अमेंडमेट कायदा कलम ७,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महा.पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ बालन्याय (काळजी व संरक्षण)अधिनियम सन २०१५ चे कलम ८३(२)** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल तपासा दरम्यान यातील टोळी प्रमुख आरोपी नामे **१)विनोद बालाजी सोमवंशी,वय-२० वर्ष रा.जांभुळवाडी,दत्तनगर,पुणे (टोळी प्रमुख) २)आकाश गुलाबराव कांबळे,वय-२१ वर्षे,रा.जांभुळवाडी रोड, आंबेगाव-खुर्द,पुणे ३)आदीत्य विनोद नाईक,वय-२३ वर्षे,रा.हनुमाननगर आंबेगाव-खुर्द,पुणे ४)गोविंद बबन लोखंडे,वय १८ वर्षे,रा.जांभुळवाडी रोड,कात्रज,पुणे ५)भुषण विनोद भांडवलकर,वय-१९ वर्षे,रा.जांभुळवाडी रोड आंबेगाव-खुर्द,पुणे ६)प्रविण रामा गुडे,वय-२३ वर्षे,रा.कात्रज,पुणे ७)अभिषेक देविदास भगुरे,वय-१८ वर्षे, कात्रज,पुणे (टोळी सदस्य) यांना अटक करण्यात आली असून,ते सद्या येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे येथे आहेत. तसेच सदर गुन्हयातील तीन विधीसंघर्षित बालके ताब्यात असुन,तीन पाहिजे आरोपी आहेत.**

यातील आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता **१)विनोद बालाजी सोमवंशी (टोळी प्रमुख)** याने त्याचे सह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नविन साथीदार यांना सोबत घेवुन,स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले असुन,त्यांनी टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी दरोडा,खंडणी,खुनाचा प्रयत्न,दंगा,दुखापत करणे,गंभीर दुखापत करणे,मारामारी,बेकायदेशिर हत्यार जवळ बाळगणे,अग्नीशस्त्रे जवळ बाळगणे,सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे जनमानसात दहशत पसरविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२) ३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करणे कामी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड यांनी पोलीस उप-आयुक्त,परि-२,पुणे शहर,श्रीमती.स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे ६४५/२०२३ भादवि कलम ३०७,३८५,३८७,३२४,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६(२),१२०(ब),४२७,क्रिमीनल लॉ अमेंडमेट कायदा कलम ७ आर्म ॲक्ट कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम सन २०१५ चे कलम ८३ (२) या गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढिल तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगांवकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर,श्री.संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परि-२,पुणे शहर,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विनायक गायकवाड,पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक, कुलदीप व्हटकर, सर्व्हेलन्स पथकाचे पोलीस उप-निरीक्षक,मोहन कळमकर व सहा.पो.फौज.चंद्रकांत माने, पोलीस अंमलदार, नरेंद्र महांगरे, विशाल वारुळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत.**त्यांचे मार्गदर्शना खाली मकोका अंतर्गत केलेली सन-२०२३ या चालु वर्षातील एकुण ७९ वी कारवाई आहे.**